या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

पाटोदा PATODA SANCHAR

# संचार

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे




❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक १४४ वा ❑ मंगळवार दि. १५ जुलै २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -144 ❑ Tuesday 15 July 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

# ज्ञानराधा मल्टीस्टेट सोसायटीच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी २३८ मालमत्ता तातडीने जप्त करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट सहकारी क्रेडीट सोसायटीच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

ठेवीदारांना न्याय देण्यासाठी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित आरोपींवर तत्काळ कारवाई करावी. तसेच सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करण्याचे, निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

ज्ञानराधा मलटीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी ने मुदत ठेव, बचत ठेव, चक्रवर्ती ठेवींवर १० ते १८ टक्के व्याजदराचे आकर्षण ठेव योजनांचे आमिष दाखवून ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित पोलीस, विशेष तपास यंत्रणांना गतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पणन मंत्री जयकुमार रावल, मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे,



राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रकाश सोळंके, अर्जुन खोतकर, सुरेश धस, संतोष दानवे, सुभाष देशमुख, विजयसिंह पंडित, रत्नाकर गंगारवेड, अपर पोलीस अधीक्षक किरण पाटील, उपअधिक्षक शशिकांत सावंत, अतिरिक्त मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, प्रधान सचिव सहकार व पणन, सहकार आयुक्त उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनेक सामान्य आणि गोरगरीब ठेवीदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, संबंधित १९ आरोपींवर तातडीने कारवाई करण्यात यावी. बहुराज्य सहकारी संस्था नियंत्रक विभागामार्फत सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करा, त्यासाठी विशेष मोहीम राबवावी. ङ्गबीड जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट सोसायट्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी एकत्रित बैठक घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा. फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी ही कारवाई आवश्यक असून, या प्रकरणांमध्ये कठोर आणि वेळेत निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# ठाकरेंची मागणी मान्य पण तारीख सांगितली नाही; शिवसेना नाव अन् चिन्हावर सुनावणी पुढे ढकलली

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांना देण्याच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिलं होतं. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुख्य याचिकेवर निर्णय करणे योग्य राहील असं न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सुनावणीवेळी म्हटलं. या




प्रकरणी सुनावणी पुढे ढकलताना ऑगस्ट महिन्यातली तारीख देऊ. तोपर्यंत जर निवडणुका लागल्या तर निवडणूक लढा असंही न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सुनावणीवेळी स्पष्ट केलं.

एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडत थेट शिवसेना पक्षावर दावा केला होता. यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांना दिले. पण या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. या प्रकरणी सुनावणीबाबत गेल्या दोन वर्षांपासून अनिश्चितता होती. आता सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्टमध्ये तारीख देऊ असं सांगितलं आहे. त्यामुळे पुढील सुनावणीत काय होणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलंय.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह शिंदेंना देण्याच्या निर्णयाला ठाकरेंनी आव्हन दिलं होतं. या आव्हान याचिकेवर सुनावणी झाली. उद्धव ठाकरे यांनी केलेल्या मागणीला एकनाथ शिंदे यांनी विरोध केला. एकनाथ शिंदे यांच्यावतीने मुकूल रोहतगी आणि नीरज किशन पान दोन वर

# डोक्यात हवा जाऊ देऊ नका; .अन् एकनाथ शिंदेंनी आमदार, मंत्र्यांना सुनावलं

**मुंबई । प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांमध्ये शिवसेनेच्या काही नेत्यांचे वादग्रस्त व्हिडीओ समाज माध्यमांवर चांगलेच व्हायरल झाले आहेत. शिवसेनेचे नेते संजय गायकवाड यांनी जेवण खराब दिल्याचा आरोप करत आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमधल्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती, त्यांचा व्हिडीओ समोर आल्यानंतर विरोधकांनी टीकेची झोड उठवली, हे प्रकरण ताजं असतानाच शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांचा बॅगेसोबतचा एक व्हिडीओ समोर आला, त्या बॅगेमध्ये रोकड असल्याचा आरोप सुरू आहे.

दरम्यान या सर्व घटनांनंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ॲक्शनमोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे. शिवसेनेच्या वादग्रस्त मंत्री आणि आमदारांना एकनाथ शिंदे यांनी चांगलंच सुनावलं आहे.

गेल्या काही दिवसांत काही गोष्टी घडल्या, तुमच्याकडे दाखवलेलं बोट माझ्याकडे असतं.तुमचे आमदार काय करतात? असा प्रश्न मला विचारला जातो. तुम्ही सगळी माझी माणसं आहात. आपलं कुटुंब एक आहे. तुमची बदनामी म्हणजे माझी बदनामी आहे . पान दोन वर

# राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढा -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

नागरिकांना शासकीय सेवा जलद, पारदर्शकपणे आणि कालमर्यादेत मिळण्यासाठी राज्यसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत मिळण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे विहित कालमर्यादेत तातडीने निकाली काढावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्यासह सर्व संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी विविध विभागांद्वारे निपटारा झालेली प्रकरणे आणि प्रलंबित प्रकरणांचा पान दोन वर

# जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी; विधेयकाच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने विधिमंडळ अधिवेशनात मंजूर केलेले जनसुरक्षा विधेयक २०२५ हे लोकशाहीला घातक असून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे, असा आरोप करत आज दि.१४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू,




राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासाठी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

**विधेयकावर ठाम आक्षेप**

डॉ. ढवळे म्हणाले की, हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित असून सरकारला जाब विचारणाऱ्या कार्यकर्ते, पत्रकार व संघटनांचे तोंड बंद करण्याचे साधन आहे. संशयावरून कोणालाही अटक, संघटना बेकायदेशीर ठरवणे, मालमत्ता जप्ती, बँक खाती गोठवणे यांसारख्या अमर्याद अधिकारांची तरतूद या विधेयकात आहे.

जनसुनावणीशिवाय पारित करण्यात आलेल्या या विधेयकावर १२ हजारांहून अधिक नागरिक व पान दोन वर

# बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समितीचे गण अखेर जाहीर

## जिल्हा परिषदेमध्ये एक गट वाढला तर येवता आणि उमरी नवे पंचायत समिती गण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची परिशिष्ट ५ (अ) व परिशिष्ट ५ (ब) अधिसूचना आज १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर आणि बीड जिल्हा सूचना विज्ञान केंद्राच्या (छखउ) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे आता ६१ गट असणार असून १२२ पंचायत समितीचे गण असणार आहेत त्यानुसार बीड जिल्ह्यात येवता हा नवीन गट तर येवता आणि उमरी हे नवे पंचायत समितीचे गण असणार आहेत.

जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, बीड जिल्हा परिषदेच्या निवडणूक अनुषंगाने विभागीय संरचना निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार जिल्ह्यातील विभागांची एकूण संख्या आणि त्याचे क्षेत्र हे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या आदेशानुसार, नागरिकांनी हरकती/सूचना लेखी स्वरूपात पुढील ७ दिवसांत (१८ जुलै २०२५ पर्यंत) जिल्हाधिकारी कार्यालयात सादर कराव्यात, असेही नमूद करण्यात आले आहे. या आदेशात नमूद केल्यानुसार पान दोन वर

# भरधाव पिकअपने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक; दोघांचा मृत्यु

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील काकडहिरा-निरगूडी रोडवर भरधाव पिकअपने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यु झाल्याची घटना आज सोमवार (दि.१४) रोजी सकाळी ०८:०० च्या सुमारास घडली.

काकडहिरा येथील वामन महादेव तावरे (वय ५४) आणि सुभाष आप्पाराव जायभाये हे आज सकाळी दुचाकी क्रमांक एम.एच.२३. के.७०१५ वरून काकडहिरा येथून निरगुडीला जात असतांना काकडहिरा शिवारात समोरून येणारा पिकअप क्रमांक एम.एच.१६.ए.वाय. ९३८२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील पिकअप भरधाव चालवून जायभाय, तावरे यांच्या दुचाकीला समोरून जोराची धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला, हातापायाला गंभीर मार लागल्याने त्यांना उपचारासाठी बीडच्या एका खाजगी रूग्णालयात आणले. तेथून जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या अपघाताची नोंद जिल्हा रूग्णालयातील पोलीस चौकीत करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाचे संघटन मजबूत करा-शंकर देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषदा पंचायत समिती नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीची संघटना मजबूत करा असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माजलगाव



मतदारसंघातील वडवणी, धारूर, माजलगाव व गेवराई विधानसभेतील मंडळाच्या या सर्व बैठका प्रसंगी ते बोलत होते.

भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक कार्यासाठी आयोजित केलेल्या या सर्व बैठकांमध्ये बुथ बांधणी , शक्ती केंद्राची पुनर्बांधणी पासून मंडल कार्यकारिणी व लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त तयारीचा आढावा पान दोन वर

संचार

# लाडकी बहीण योजना; सरकारसाठी ठरली डोकेदुखी!

महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजना ही राजकीय वादाचा विषय बनली आहे. या योजनेमुळे विकास कामांसाठी निधी मिळण्यात विलंब होत असल्याचे आरोप केले जात आहेत. कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी याबाबत आपली भूमिका मांडली आहे. विरोधकांना यामुळे नवा मुद्दा मिळाला आहे आणि राजकीय चर्चा तीव्र झाली आहे. योजनेचे फायदे आणि तोटे यावर चर्चा सुरू आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुतीला पुन्हा सत्तेत बसवण्यासाठी गेमचेंजर ठरली. या योजनेनुसार पात्र लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये दर महिना दिले जातात. मात्र या योजनेसाठी अनेक विकासकामांचा, विविध विभागाचा निधी वळवण्यात आल्याचा आरोप वारंवार होत असतो. आता राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या एका आमदाराने लाडकी बहीण योजनेमुळे विकास निधीसाठी दिरंगाई होत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा लाडकी बहीण योजनेवरुन आरोप – प्रत्यारोप सुरु झाले आहेत.

कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी लाडकी बहीण योजनेमुळे विकास निधी मिळण्यास विलंब होत असल्याची जाहीर कबुली दिली आहे, ज्यामुळे या योजनेबद्दल नव्याने चर्चा सुरू झाली आहे. तर, दुसरीकडे मंत्री छगन भुजबळ यांनीही या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येत असल्याचे मत व्यक्त केले आहे.

मंत्री दत्तात्रय भरणे यांनी एका कार्यक्रमात बोलताना लाडकी बहीण योजनेवर वक्तव्य केलं. इंदापूर तालुक्याला सर्वाधिक विकास निधी मिळावा यासाठी आपण प्रयत्न करत असतो, पण लाडकी बहीण योजनेमुळे निधी मिळण्यास विलंब होतो. आता मंत्री भरणे यांच्या या वक्तव्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्याचबरोबर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं, की, यात लपवण्यासारखे काहीच नाही. लाडकी बहीण योजनेमुळे इतर गोष्टींना ताण सहन करावा लागेल.

दत्तात्रय भरणे यांच्या वक्तव्यावर आपले मत मांडताना छगन भुजबळ म्हणाले, १०० टक्के मलाही वाटतं आणि कोणालाही वाटणे हे साहाजिकच आहे. लाडक्या बहिणीसाठी सरकारकडे शिल्लक निधी नव्हता. जोपर्यंत नीट घडी बसत नाही, तोपर्यंत हा ताण सहन करावा लागणार आहे. पूर्ववत घडी कशी बसणार यासाठी प्रयत्न करत असल्याचेही भुजबळ यांनी सांगितलं. लाडकी बहीण योजना, शिवभोजन थाळी याचे देखील पैशांना उशीर होत आहे. पैसे कुठेही जाणार नाहीत, सर्वांना ते पैसे मिळणार. कशाला प्राधान्य द्यायचे हे सरकारने ठरवायचे असते, असेही भुजबळ यांनी सांगितलं.

लाडक्या बहिणाबाईंना पैसे मिळत आहेत, मात्र लाडक्या भावांचे अनुदान अद्याप मिळाले नाही. त्यांना पण पैसे मिळतील. एखाद्या मोठ्या घरात खर्च वाढतो, त्यावेळी नेहमीचे खर्च मागे–पुढे आपण करतो, सगळ्यांना पैसे मिळणार. शेवटी लाडक्या बहिणीचे पैसे लाडक्या भावाच्या घरातच जातात ना, लाडक्या बहिणी थोडी सगळे पैसे खर्च करत असतात. लाडक्या बहिणीचा भार सरकारी तिजोरीवर पडला हे खरं आहे, त्यात लपवण्यासारखे काय? असंही भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

छगन भुजबळ यांनी राज्याच्या आर्थिक स्थितीवरही भाष्य केले. ते म्हणाले, राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्या पॉलिसी आहेत. राज्याच्या विविध योजनांचा खर्च वाढत आहे. सरकार आपल्याकडूनच टॅक्स गोळा करते. मागील वर्षापासून खर्च वाढला आहे, त्यामुळे हातमिळवणी करावी लागणार आहे. खर्च वाढत असेल तर कुठून तरी टॅक्स वाढवावे लागतील. सारथी, बार्टी, लाडकी बहीण या योजनांचा खर्च होतोय. त्यासाठी इन्कम तर वाढवावा लागेल. अजित पवार हे अर्थमंत्री आहेत. जास्तीत जास्त पैसे गोळा करणे आणि ते खर्चायला देणे हे त्यांचे काम आहे, असेही भुजबळ यांनी नमूद केले.

यापूर्वीही दत्तात्रय भरणे यांनी विकास निधीमध्ये होणाऱ्या दिरंगाईबद्दलही भाष्य केले होते. त्यावेळीही त्यांनी लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केला होता. आता पुन्हा त्याच मुद्द्यावर भाष्य केल्याने राजकीय समीकरणे आणि निधी वाटपावरून नव्याने चर्चा सुरू झाली आहे. काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर ताण येत असल्याचे बोललं जात होतं. तसेच यामुळे इतर विकासकामांच्या निधी वाटपात विलंब होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरू होती. मात्र आता खुद्द कॅबिनेट मंत्र्यांनीच अप्रत्यक्षपणे याची कबुली दिल्याने या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. त्यांच्या या विधानामुळे विरोधकांना नवा मुद्दा मिळाला आहे.

# एकनाथ शिंदेंना 'संजय' लाभदायक नाही?



एकीकडे राज्यभरातील महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांची मोर्चेबांधणी सुरू आहे. तर, दुसरीकडे महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यातील नेत्यांमध्ये विविध मुद्द्यांवरून आरोप प्रत्यारोप सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे राजकीयदृष्ट्याही एकत्र येणार का, राज ठाकरे यांची उद्धव ठाकरे यांच्याशी युती झालीच, तर महाविकास आघाडीत ते सामील होणार का, अशा अनेक मुद्द्यांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. यातच शिवसेना शिंदे गटातील संजय गायकवाड, संजय शिरसाट यांच्यामुळे एकनाथ शिंदे आणि शिवसेना पक्षाची डोकेदुखी वाढल्याची चर्चा आहे.

शिंदेसेनेचे बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांनी मंत्रालयाजवळील आकाशवाणी आमदार निवासाच्या कॅन्टीनमध्ये तेथील कर्मचाऱ्याला गावगुंडाप्रमाणे बेदम मारहाण केली. याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राजकीय, सामाजिक क्षेत्रांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. यावरून विरोधकांनी जोरदार टीका केली. यानंतर मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ समोर आला. यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शिवसेना शिंदे गटावर निशाणा साधला. दोन्ही प्रकरणांमुळे शिवसेना शिंदे गटाची डोकेदुखी वाढल्याचे म्हटले जात आहे.

**एकनाथ शिंदेंना 'संजय' लाभदायक नाही?**

शिंदेसेनेचे आमदार 'संजय' गायकवाड यांनी आमदार निवासात कँटीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा विषय समाज माध्यमावर चर्चेत आहे. तर पक्षाचे मंत्री 'संजय' शिरसाट यांनी भर कार्यक्रमात आयकर खात्याकडून आलेल्या नोटीसबाबत केलेले वक्तव्य आणि आता बेडरूमधील बॅगसोबत व्हिडीओही व्हायरल होत आहे. त्यातच उद्धवसेनेचे 'संजय' राऊत यांच्याकडून येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे एकनाथ शिंदे यांची डोकेदुखी वाढली नसेल तरच नवल. आता शिंदेसेनेचे अजून एक मंत्री 'संजय' राठोड अद्याप शांत आहेत. त्यांचे एखादे वादग्रस्त वक्तव्य किंवा व्हिडीओ आलाच तर 'संजय' हे नाव शिंदे यांना लाभदायक नाही यावर शिक्कामोर्तब होईल, अशी कुजबुज राजकीय वर्तुळात होत आहे.

दरम्यान, शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी येथील आमदार निवासातील उपहारगृह कर्मचाऱ्यांना केलेल्या मारहाणप्रकरणी मरीन ड्राइव्ह पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदविला आहे. व्हायरल व्हिडीओ व साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीनंतर पोलिसांनी स्वतः फिर्यादी बनून हा गुन्हा नोंदविला आहे.

राज्यातील शिंदे गटातील नेत्यांवर सातत्याने वादग्रस्त आरोप होऊ लागले असताना, आता जलसंधारण मंत्री संजय राठोड हेही अडचणीत सापडले आहेत. यापूर्वी मंत्री भरत गोगावले, मंत्री संजय शिरसाट, आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार संजय गायकवाड यांच्यावर टीका झाली होती.

आता राठोड यांच्यावरही थेट भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने एकनाथ शिंदे गटाच्या अडचणींमध्ये भर पडली आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणात संजय राठोड यांना 'दणका' दिला आहे. त्यामुळे परिस्थिती हाताळण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने आपल्या आमदार, खासदार आणि पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. ही बैठक 'डॅमेज कंट्रोल'साठी घेतली जात असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**वादात इतरही नेते**

या पार्श्वभूमीवर शिंदे गट आणि महायुतीतील इतर नेतेही विविध वादांमध्ये अडकताना दिसत आहेत.आमदार अर्जुन खोतकर यांच्या धुळे दौऱ्यादरम्यान त्यांच्या स्वीय सहाय्यकाच्या रूममध्ये रोकड सापडली, आणि सद्यस्थितीत या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.रोहयो मंत्री भरत गोगावले हेही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार सुनिल तटकरे आणि खासदार नारायण राणे यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आले. त्यानंतर त्यांचा एक विवादास्पद व्हिडीओ आणि फोटो व्हायरल झाल्याने ते पुन्हा अडचणीत आले आहेत.

या सर्व घटनांमुळे महायुती सरकार आणि विशेषतः शिंदे गटाचे अनेक मंत्री आणि आमदार अडचणीत आले असून, सरकारची प्रतिमा धक्का बसत असल्याचे विरोधकांकडून सांगितले जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर आता पक्षातील अनुशासन आणि सार्वजनिक प्रतिमेचं रक्षण करणं हे मोठं आव्हान ठरत आहे.

# पत्नीचा कॉल रेकॉर्ड करणे न्यायालयाने ठरवले वैध; पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचा निकाल रद्द !

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

पत्नीच्या परवानगीशिवाय फोनवरील संभाषण रेकॉर्ड करणे हे गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे आणि ते कुटुंब न्यायालयात पुरावा म्हणून सादर केले जाऊ शकत नाही असा निर्णय एका प्रकरणात पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिला होता.

मात्र आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत वरिष्ठ न्यायालयाने उच्च न्यायालयाचा हा निर्णय रद्द केला.

'लाइव्ह अँड लॉ'च्या बातमीनुसार, न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की घटस्फोटाच्या कार्यवाहीत पती-पत्नीमधील गुप्तपणे रेकॉर्ड केलेले फोन संभाषण पुरावा म्हणून वापरले जाऊ शकते.

भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १२२ नुसार पती-पत्नीमधील संभाषणे संमतीशिवाय उघड करण्यास प्रतिबंधित केले आहे, परंतु त्याला एक अपवाद देखील आहे. हा अपवाद अशा प्रकरणांमध्ये लागू होतो जिथे पती-पत्नीमध्ये कायदेशीर कार्यवाही सुरूआहे किंवा एक पक्ष दुसऱ्या पक्षाविरुद्ध गुन्ह्याच्या प्रकरणात खटला लढत आहे.

न्यायालयाने पुढे म्हटले की, या प्रकरणात गोपनीयतेचे कोणतेही उल्लंघन झाले आहे असे आम्हाला वाटत नाही. कलम १२२ गोपनीयतेच्या अधिकाराला मान्यता देत नाही. उलट, ते पती-पत्नीमधील गोपनीयतेच्या अधिकाराला अपवाद करते. ते निष्पक्ष सुनावणीचा, संबंधित पुरावे सादर करण्याचा आणि स्वतःचा खटला सिद्ध करण्याचा अधिकार ओळखते, जेणेकरून पक्षकाराला दिलासा मिळू शकेल.

**काय आहे प्रकरण?**

हे प्रकरण घटस्फोटाच्या कारवाईबद्दल आहे. पतीने पत्नीवर क्रूरतेचा आरोप केला आणि रेकॉर्ड केलेले फोन संभाषण पुरावा म्हणून भटिंडा येथील न्यायालयात सादर केले. कुटुंब न्यायालयाने या रेकॉर्डिंग्ज पुरावा म्हणून स्वीकारल्या.

पत्नीने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आणि असा युक्तिवाद केला की हे रेकॉर्डिंग तिच्या संमतीशिवाय केले गेले आहेत आणि ते तिच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे.

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने पत्नीच्या बाजूने निकाल दिला आणि कौटुंबिक न्यायालयाचा आदेश रद्द केला. उच्च न्यायालयाने म्हटले की फोन संभाषणातील परिस्थिती आणि उत्तरे योग्यरित्या समजू शकत नाहीत.

असेही म्हटले आहे की पती-पत्नी आपापसात उघडपणे बोलतात आणि त्यांचे शब्द न्यायालयात चौकशीचा विषय बनू शकतात याचा विचार ते करत नाहीत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करत पतीच्या बाजूने निकाल दिला आहे.

# एसटीचे कदापि खाजगीकरण होऊ देणार नाही; परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी स्पष्टच सांगितले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाचा अंगीकृत सार्वजनिक उपक्रम असलेली असलेली एसटी सुमारे ८३ हजार कर्मचाऱ्यांची मातृसंस्था आहे. भविष्यात एसटीचे कदापि खाजगीकरण होणार नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

मुंबईतील परळ बसस्थानकामध्ये कामगार नेते भाई जगताप यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे यांच्या पुढाकाराने कर्मचारी व प्रवाशांसाठी जलशीतकाचे लोकार्पण करताना मंत्री सरनाईक बोलत होते.



मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटीचा कर्मचारी अत्यंत मेहनती आहे. तो काम करीत असलेल्या ठिकाणी त्याला मूलभूत सोयी - सुविधा पुरविणे ही एसटी प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे चालक-वाहक विश्रांती गृह, तेथील प्रसाधनगृह स्वच्छ असली पाहिजेत. त्यासाठी आपण लवकरच खाजगी स्वच्छता संस्था नेमत असून, त्यांच्याकडून विश्रांती गृहाच्या स्वच्छतेबरोबर कर्मचाऱ्यांचे गणवेश स्वच्छ धुऊन इस्त्री करून कर्मचाऱ्यांना देण्याबाबत व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

एवढेच नाही तर कर्मचाऱ्यांचे केश कर्तनाची व्यवस्था स्वच्छता संस्थेच्या वतीने करण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या मुलभूत गरजांकडे अशा प्रकारे लक्ष दिल्यास कर्मचाऱ्यांसाठी, कामगिरी करणाऱ्यांसाठी अनुकूल मानसिक परिस्थिती निर्माण करणे शक्य होते. अर्थात, याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये होऊन त्यांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# राज्याचं महसूल वाढवण्यासाठी नवीन दारू परवाने देणं योग्य नाही, या धोरणामुळे जनजीवन विस्कळीत होऊ शकतं – अंबादास दानवे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य उत्पादक शुल्क विभागाने राज्यात ३२८ नवीन दारू परवाने देण्याचा निर्णय घेतला असून, याला विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. विधान परिषदेत बोलताना दानवे म्हणाले, 'राज्य उत्पादक शुल्क विभागाच्या वतीने राज्यामध्ये ३२८ नवीन दारूचे परवाने देण्यात येत आहे.

८ महसूली विभागात हे परवाने दिले जाणार आहे. १९७२ पासून असे परवाने राज्यात बंद होते. राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे मद्य धोरण आखण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीतील लोकं दारूचे वितरण व पुरवठा व्यवस्था नियंत्रित करत असते.

अंबादास दानवे म्हणाले की, राज्याचा महसूल वाढविण्यासाठी अशाप्रकारे दारूच्या ३२८ नवीन दुकानांना परवाने दिले जात असतील तर ते राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. माता - भगिनी यांचा या धोरणाला कठोर विरोध आहे.

ते म्हणाले की, सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना परवाने देण्यासाठी हे नवीन ३२८ दुकानांना परवानगी दिली जात आहे का? अशी स्थिती असेल तर या धोरणाला आमचा विरोध असणार आहे. राज्याचे जनजीवन या धोरणामुळे विस्कळीत होऊ शकते.



## पान १ वरुन

### ठाकरेंची मागणी मान्य पण

कौल यांनी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला. तर ठाकरे गटाची बाजू रोहित शर्मा आणि कपिल सिब्बल यांनी मांडली.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी मुख्य सुनावणी सुरू करण्यास सांगितल्यानंतर ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी ऑगस्ट महिन्यात या सुनावणीसाठी तारीख द्यावी अशी विनंती केली. यावर सर्वोच्च न्यायालयाने वेळापत्रक तपासून सुनावणीची तारीख कळवतो, तोवर जर निवडणुका लागल्या तर तुम्ही निवडणूक लढा असंही न्यायमूर्तींनी सांगितलं.

### डोक्यात हवा जाऊ देऊ नका;

चुकीच्या गोष्टींवर एनर्जी वाया घालवू नका. कमी बोला जास्त काम करा, बदनामीमुळे काही मंत्र्यांना घरी जावं लागलं, असं म्हणत यावेळी एकनाथ शिंदे यांनी आपल्या आमदार आणि मंत्र्यांना अप्रत्यक्ष इशाराही दिला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या परिवारावर कारवाईचा बडगा उगारायला मला अजिबात आवडणार नाही. परंतु, मला कारवाई करावी लागणार नाही, तसंच काम तुमच्याकडून अपेक्षित आहे. मी रागावत नाही. मी प्रमुखासारखं वागत नाही. कार्यकर्त्यासारखं वागतो. तुम्हीही तसंच वागा. आपल्या डोक्यात हवा जाऊ देता कामा नये. कितीही पदं मिळाली तरी कार्यकर्ता आहे, असंच समजून कामं करा . कमी वेळात जास्त यश मिळालंय. लोकं आपल्या पाठीशी आहे . त्यामुळे बदनामीचे डाव रचले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीची काळजी घ्या. यापुढील काळ कसोटीचा आहे. सामाजिक जीवनात पथ्य पाळावी लागतात. ती काळजी घ्या, असं एकनाथ शिंदे यांनी आपल्या नेत्यांना आणि आमदारांना म्हटलं आहे.

### राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत

आढावा घेतला. तसेच सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ प्रसिद्ध करण्यात यावा. पोर्टलवरील प्राप्त तक्रारी विहित वेळेत निकाली काढाव्यात. प्रलंबित तक्रारीचा व निकाली काढलेल्या तक्रारींचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास वेळेत सादर करावा, अशा सूचनाही कार्यालय प्रमुखांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी केल्या.

### जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी;

संघटनांनी आक्षेप नोंदवले असून, 'नक्षलवाद' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख नसतानाही 'कडव्या डाव्या विचारसरणी' या संज्ञेच्या आधारे कार्यकर्त्यांवर कारवाईचा धोका निर्माण झाल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

**विधेयक तातडीने रद्द करा**

हे जनसुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक आहे. लोकशाहीत आंदोलन व प्रश्न विचारण्याचा अधिकार मूलभूत आहे. या विधेयकाचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता ते तातडीने रद्द करण्यात यावे, अशी ठाम मागणी आंदोलक कार्यकर्त्यांनी केली.

निदर्शनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक कॉम्रेड.नामदेव चव्हाण, आयटक नेते,माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), डी .जी.तांदळे अध्यक्ष किसानसभा महाराष्ट्र राज्य, कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे , कॉम्रेड भाऊराव प्रभाळे ,बीड जिल्हा सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष, जगन्नाथ बहीर, मराठवाडा शिक्षक नेते, कॉम्रेड बी.एस. दहिवडे, सखाराम बेगडे बीड जिल्हा सचिव (इंटक), कॉम्रेड. व्ही.एन.सवासे आदी सहभागी होते.

### जिल्हा परिषद पंचायत समिती व

घेण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीसाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व धारूरचे नगराध्यक्ष स्वरूप सिंह हजारी माजलगाव येथील भाजपाच्या राज्य परिषदेवर निवड झालेले अरुण राऊत जिल्हा सरचिटणीस प्रा. देविदास नागरगोजे, संजय आंधळे , श्रीकांत सानप आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. माजलगाव व गेवराई विधानसभेतील आठ मंडळाच्या या बैठकांमध्ये कार्यकर्त्यांनी पंकजाताई यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहाबद्दल साजरा करावा व बुथ रचना पूर्ण करून लवकरात लवकर मंडळ कार्यकारिणी पूर्ण करून द्याव्यात अशा प्रकारचे आव्हान जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी याप्रसंगी केले.

पुढे बोलताना ते असे म्हणाले की, आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून या कार्य निवडणुकांसाठी मजबूत बुथ बांधणी करून , शक्ती केंद्र वॉरियर्स पासून ते पन्ना प्रमुखापर्यंत सर्व संघटनात्मक बांधणी लवकरात लवकर पूर्ण करावी व मंडल कार्य कारीण्या देखील लवकर कराव्यात अशा प्रकारचे आव्हान या प्रसंगी त्यांनी केले. या सर्व बैठकांमध्ये भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे यांनी संघटनात्मक बांधणीचे महत्त्व सांगून प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर मंडळ कार्यकारिणी पूर्ण कराव्यात अशा प्रकारचे आव्हान केले.

या सर्व बैठकासाठी वडवणी येथे उपनगराध्यक्ष बन्सी मुंडे , मंडला अध्यक्ष सुखदेव रेडे, चोले दादा, मच्छिंद्र झाटे ,ईश्वर तांबडे, धनंजय मुंडे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते तर धारूर मंडळाच्या बैठकीत नगराध्यक्ष डॉ. स्वरूप सिंहाचारी , एँड. बाळासाहेब चोले ,दत्ता धोत्रे , अँड .भोसले रामचंद्र मुंडे यांच्यासह मंडलाध्यक्ष काचगुंडे हे उपस्थित होते .माजलगाव येथील बैठकीत मंडलाध्यक्ष रूपालीताई कचरे ,विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके ,माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके , अभय भैया ओके , यांचेसह माऊली सरवदे , दत्ता महाजन ,ज्ञानेश्वर नाना मेंडके, ईश्वर खुरपे, आधी पदाधिकारी उपस्थित होते तर गेवराई येथील बैठकीत मंडलाध्यक्ष प्रकाश सुरवसे,सुरेश हात्ते, अशोक शिंदे,उद्धव रासकर, राजेश पवार, सचिन दाभाडे, ज्ञानेश्वर खाडे,महादेव धोंडरे,बळीराम कऱ्हे, देविदास खरात,बाबा पिसाळ,महादेव बारगजे,महादेव खटके,संतोष थोरात, कृष्णा ढाकणे,प्रदीप उगलमुगले, परमेश्वर राठोड, यांचे सहप्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड जिल्ह्याचे जिल्हा परिषद

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या प्रारूप विभाग रचनेविषयी हरकती नोंदविता येतील. यासाठी संबंधितांनी पुरावे व आवश्यक दस्तऐवजांसह आपली भूमिका सादर करावी.

## थोडक्यात

### ड्रग्ज व्यापार रोखण्यासाठी महायुती सरकारचा मोठा निर्णय! आरोपींना होणार कठोर शिक्षा, मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ड्रग्ज व्यापाराबाबत सरकारने मोठे पाऊल उचलण्याची तयारी केली आहे. विधानसभेत एक महत्त्वाची घोषणा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात ड्रग्ज विक्रीत सहभागी असलेल्या आरोपींना वारंवार अटक होऊनही जामिनावर सोडण्यात आल्यास त्यांच्यावर आता मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) लागू केला जाईल. यासाठी सध्याच्या कायद्यात सुधारणा केली जाईल.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका माहितीला उत्तर देताना हे आश्वासन दिले. ते म्हणाले की, अल्पवयीन मुलांना ड्रग्जच्या व्यापारात गुंतवून आणि त्यांचा माध्यम म्हणून वापर करून कायद्यातील कमकुवतपणाचा फायदा घेतला जात आहे. ही प्रवृत्ती थांबवण्यासाठी, सरकार आता कायदेशीर व्याख्या बदलेल आणि १६ वर्षांच्या आरोपींनाही अटकेच्या कक्षेत आणेल.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आता ड्रग्जशी संबंधित गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभागी असलेल्या आरोपींवर मकोका लागू करण्याची तरतूद असेल, जेणेकरून त्यांना कठोर शिक्षा देता येईल आणि जामिनावर सुटण्याचा मार्ग बंद करता येईल. परदेशी नागरिक, विशेषतः नायजेरियन वंशाचे, या गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याचे आढळून येते.

कायद्यानुसार, त्यांना त्यांच्या देशात परत पाठवता येते, परंतु ते किरकोळ गुन्हे करतात आणि हद्दपारी टाळण्यासाठी भारतात राहतात. याकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यात आले आहे आणि त्यांच्या किरकोळ गुन्ह्यांना माफ करून त्यांना लवकरात लवकर त्यांच्या देशात परत पाठवण्याचा प्रस्ताव आहे, असं त्यांनी सांगितले आहे.

### बनावट खतांविरोधात राज्यांनी कठोर पावले उचलावीत

नवी दिल्ली । वृत्तसेवा

देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीबाबत वाढती चिंता व्यक्त करत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना गुणवत्तापूर्ण खते वेळेवर व योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्री चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कृषी ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यासाठी दर्जेदार खतांची वेळेवर उपलब्धता अत्यावश्यक आहे. त्यांनी बनावट खतांची विक्री, अनुदानावरील खतांचा काळाबाजार आणि जबरदस्तीने टॅगिंग करण्यासारख्या बेकायदा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही राज्यांची जबाबदारी असून, काळा बाजार, जादा किमतीत विक्री आणि अनुदानावरील खतांचे चुकीच्या पद्धतीने वितरण यावर कडक नजर ठेवावी. खतांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवून सॅम्पलिंग आणि चाचणी प्रक्रियेद्वारे निकृष्ट दर्जाच्या खतांवर नियंत्रण ठेवावे. पारंपरिक खतांसह नॅनो-खते किंवा जैव-उत्तेजकांचे जबरदस्तीने टॅगिंग थांबवून दोषींविरुद्ध परवाना रद्द करणे, गुन्हे नोंदविणे आणि कायदेशीर कारवाई करावी.

**रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देश**

शेतकऱ्यांना या प्रकारांपासून वाचवण्यासाठी त्यांना जागरूक करणे आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. शेतकरी व शेतकरी गटांना देखरेख प्रक्रियेत सहभागी करून खऱ्या-खोट्या उत्पादनांची ओळख पटवण्याची यंत्रणा विकसित करावी, असेही चौहान यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्र्यांनी राज्य शासनाला आवाहन केले आहे की, वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्यव्यापी मोहीम राबवून बनावट आणि निकृष्ट खतांचा संपूर्ण बंदोबस्त करावा. राज्य पातळीवर या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवली गेल्यास हा शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय ठरू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# समोसा अन् जिलेबी खाणं आरोग्यासाठी घातक

## हॉटेल्स, शाळांमध्ये इशारा देणारे फलक लावा, आरोग्य मंत्रालयाकडून सूचना

नागपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रसह उत्तर भारत आणि बहुतांश राज्यात मोठ्या चवीनं खाल्ला जाणारा समोसा आणि जिलेबी आरोग्यासाठी अपायकारक असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं जारी केलेल्या एका पत्रकात म्हटलं आहे. तसंच ज्या हॉटेल्समध्ये अशा तळलेल्या पदार्थांची विक्री केली जातेय, त्या हॉटेल्समध्ये कोणत्या पदार्थांमध्ये काय-काय घातलंय? ते कोणत्या तेलात तळलेलं आहे? ते पदार्थ खाल्ल्यानं आरोग्यासाठी किती हानिकारक आहे? यासंदर्भातील इशारा देणारी सर्व माहिती संबंधित हॉटेल्समध्ये फलकांवर लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.





**जनजागृती तीव्र करण्यात यावी**

दरम्यान, अद्याप कोणत्याही हॉटेल्स किंवा रेस्टॉरंटमध्ये अशा सूचनांचे फलक लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळं आता शाळांमध्ये असे फलक लावले जावेत, अशी सुद्धा मागणी जोर धरत आहे. दारू, सिगारेट आणि कोल्ड्रिंक्स प्रमाणे समोसा व जिलेबी सेवन करणं देखील शरीरासाठी प्रचंड हानिकारक असल्याचं डॉक्टर नेहमीचं सांगतात. मात्र, समोसा व जिलेबी अनेक नागरिकांसाठी नाश्त्यासाठीचा खास आवडीनं खाल्ला जाणारा पदार्थ झाला आहे. त्यामुळं आता आरोग्य मंत्रालयाकडून गाईडलाईन्स जारी करण्यात आल्यानं या विषयी जनजागृती तीव्र करण्यात यावी, अशी सूचना डॉक्टरांनी केली आहे.

**तेलाच्या वापरात १० टक्के कपात करण्याचं आवाहन**

२८ जानेवारी २०२५ रोजी देहरादूनला झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया मोहिमेचा उल्लेख केला होता. त्यावेळी, नागरिकांना निरोगी भारताच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग म्हणून सक्रिय, निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचं त्यांनी आवाहन केलं होतं. तसंच त्यांच्या 'मन की बात'मध्ये त्यांनी तेलाच्या वापरात १० टक्के कपात करण्याचं आवाहन केलं होतं.

### हॉटेल्स, शाळा, ऑफिसमध्ये फलक लावण्याच्या सूचना

दरम्यान, लोकांना निरोगी आहाराच्या सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी हॉटेल्स, रेस्टॉरंटमध्ये तेल आणि साखर खाणे आरोग्यासाठी घातक आहे. याबाबत फलक लावण्याच्या सूचना आरोग्य मंत्रालयानं दिल्या आहेत. तसंच हे फलक शाळा, कार्यालये, सार्वजनिक संस्था इत्यादींमध्ये लावले जाणार आहेत. या फलकांवर दैनंदिन खाण्यात येणाऱ्या पदार्थांमध्ये साखर आणि चरबी किती आहे, त्याची माहिती असणार आहे.

### प्रौढांसह लहान मुलांमध्ये लठ्ठपणा वाढतोय

भारतात प्रौढ आणि लहान मुलांमध्येही लठ्ठपणाचं प्रमाण हे झपाट्यानं वाढताना दिसून येतंय. NFHS-5 (२०१९-२१) नुसार, शहरी भागातील पाचपैकी एका प्रौढ व्यक्तीचं वजन हे जास्त आहे किंवा ते लठ्ठ आहेत. बालपणातील लठ्ठपणाचं प्रमाण खराब आहाराच्या सवयी व कमी शारीरिक हालचालींमुळं प्रभावित होतं. २०२५ मध्ये प्रकाशित झालेल्या द लॅन्सेट ॠइऊ २०२१ च्या लठ्ठपणाच्या अंदाज अभ्यासानुसार, भारतात जास्त वजन आणि लठ्ठ प्रौढांची संख्या २०२१ मध्ये १८ कोटींवरून २०५० पर्यंत ४४.९ कोटींपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. ज्यामुळं तो जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक भार असलेला देश बनेल. लठ्ठपणामुळेचं मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग व काही विशिष्ट कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. त्यामुळं मानसिक आरोग्य, हालचाल व जीवनमान यावरही परिणाम होतो.

## इंदिरा गांधींनी आणीबाणीला केलेली चूक भाजपानं केली

## 'जनसुरक्षे'विरोधात प्रकाश आंबेडकरांनी थोपटले दंड

मुंबई । प्रतिनिधी

इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या वेळी चूक केली होती. तीच चूक भाजपानं जनसुरक्षा कायद्याच्या रूपानं केली आहे. त्यामुळं हा कायदा आणून भाजपानं एकप्रकारे अघोषित आणीबाणी लादली आहे. म्हणून या अघोषित आणीबाणीविरोधात निर्णायक लढा देण्याची वेळ आली आहे, असे परखड मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी मांडले. ते पत्रकार परिषदेत माध्यमांशी बोलत होते.

**कायद्याविरोधात न्यायालयात लढाई**

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, हा जनसुरक्षा कायदा म्हणजे अभिव्यक्ती स्वांतत्र्यावरील घाला आहे. याविरोधात सभागृहात विरोधक कमी पडत असल्याचंही आंबेडकर म्हणाले. जनसुरक्षा विधेयकाला सभागृहात आक्रमकपणे विरोधकांनी विरोध केला नाही. पण, सामान्य लोकांनी समाजमाध्यमांवर विरोध केल्यानंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी माध्यमांसमोर येऊन बोलणं ही केवळ 'नौटंकी' आहे, अशी घणाघाती टीका आंबेडकरांनी विरोधकांवर केली.



यापूर्वीच वंचित बहुजन आघाडीनं जनसुरक्षा कायद्याला विरोध केला होता. आता याविरोधात न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं अन्य राजकीय पक्षांनीही या लढ्यात सहभागी होण्याचं आवाहन यावेळी वंचित बहुचन आघाडीच्या अध्यक्षांनी केलं.

**मग त्यांच्यावर कारवाई करणार का?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांनी शस्त्रांची पूजा केल्याचं व्हीडिओ व्हायरल होत आहेत. त्यांना ही शस्त्रे जवळ बाळगण्याची परवानगी आहे का? त्यांना शस्त्रे कोणी दिली? मग, त्यांनी शस्त्र जवळ बाळगली म्हणून 'अर्बन नक्षल' म्हणून त्यांच्यावर कारवाई करणार का? असा सवाल आंबेडकरांनी उपस्थित करत सरकारवर टीका केली.

विरोधकांच्या विरोधानंतरही दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर- महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक १० जुलैला विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत मंजूर करण्यात आलं. तर विरोधकांचा विरोध असतानाही गदारोळात १२ जुलैला हे विधेयक विधानपरिषदेत मंजूर करण्यात आलं. या कायद्याचा दुरुपयोग केला जाणार असून त्याचं नाव भाजपा सुरक्षा ठेवा, अशी टीका शिवसेनेचे (यूबीटी) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली होती. काँग्रेसनंदेखील जनसुरक्षा विधेयकावर १२ हजारांपेक्षा जास्त नागरिक आणि संघटनांनी सूचनांसह आक्षेप नोंदविले असताना जनसुनावणी न घेतल्यानं आक्षेप घेतला आहे. दुसरीकडं देशाविरोधात कारवाया करणाऱ्या संघटनांविरोधात हे विधेयक असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. विधेयकात दुरुस्ती आणि सुधारणा करुन नवीन विधेयक आणावं, अशी विरोधकांनी केलेली मागणी सरकारनं मान्य केली नाही.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मतदान केंद्राची संख्या निश्चित करताना काळजीपूर्वक निश्चित करा, असे निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरविकास विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त संजय केदार तसेच दुरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह नगरप्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी जिल्हानिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीबाबत माहिती जाणून घेतली. मतदार संख्या, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम), मतदान केंद्रांची व्यवस्था आणि इतर अनुषंगिक तयारी मतदान केंद्रांची रचना आणि निवडणूक प्रक्रियेच्या तयारी, मतदान केंद्रांवर पाणी, वीज, स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा,

ईव्हीएम सुरक्षितता आदी तयारीचा आढावा घेत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित व्यवस्थेची पाहणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी सबंधित विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

## राज ठाकरेंविरोधात डीजीपींकडे तक्रार दाखल

मुंबई । प्रतिनिधी

त्रिभाषा धोरणावरून राज्यात बराच गदारोळ झाला होता. पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याला विरोध करण्यात आला होता. यानंतर राज्य सरकारला आपला ऋठ मागे घ्यावा लागला होता. सरकारने आपला निर्णय मागे घेतल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन विजयी मेळावा घेतला.

या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या एका वक्तव्याच्या विरोधात डीजीपींकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. चला तर मग जाणून घेऊया काय आहे नेमकं प्रकरण?

**काय होते राज ठाकरेंचे वक्तव्य?**

'काल एका व्यापाऱ्याच्या कानफडात मारली. त्याच्या माथ्यावर लिहिलं होतं का गुजराती. इतर हिंदी आणि वेगळ्या चॅनलमध्ये गुजराती माणसाला मारलं. बाचाबाचीत समोरचा गुजराती निघाला. गुजरात्याला मारलं का. किती व्यापारी आहे. अजून तर काही केलं नाही. त्यांना मराठी आली पाहिजे. यात वाद नाही, ऊठसूट मारायची गरज नाही. पण जास्ती नाटकं केली तर कानाखाली आवाज काढला पाहिजे' असे राज ठाकरे म्हणाले होते.

पुढे ते म्हणाले होते की, 'पण चूक त्यांची असली पाहिजे. अशी कधी गोष्ट कराल तर त्याचे व्हिडीओ काढू नका. आपल्या आपल्यातच त्यांना कळलं पाहिजे. कळलं का? मारणारा कधी सांगणारा नसतो. मार खाणारा सांगतो. मला मारलं. त्यांना सांगू देत. पण ऊठसूट कुणाला मारू नका. अनेक लोक आहेत. माझ्या परिचयाचे आहे. माझा मित्र आहे, नयन शाह. मी त्याला गुजराठी म्हणतो. तो अप्रितम मराठी बोलतो. पण विनोदाचं अंग आहे. शिवाजी पार्कात हेडफोन लावून पुलं देशपांडे ऐकणारा गुजराती आहे. मराठीचं हे बाळकडू आमच्यासाठी बाळकडूच होतं.'असे राज ठाकरे म्हणाले होते.

## अन्यथा आंदोलन अजून तीव्र करणार-बच्चू कडू

उमरखेड । प्रतिनिधी

शेतकर्यांच्या हक्कांसाठी लढा देणारे प्रहार संघटनेचे संस्थापक माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांच्या 'सातबारा कोरा यात्रा' चा समारोप अंबोडा(ता,महागाव) येथे सोमवारी (दि,१४) जनसामान्यांच्या प्रचंड सहभागाने पार पडला. या समारोपप्रसंगी बच्चू कडूंनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, सातबारा कोरा न झाल्यास शासनाला स्वस्थ बसू देणार नाही. त्यांनी शासनाला इशारा दिला की जर लवकरच निर्णय घेतला गेला नाही, तर 'सातबारा आंदोलन' अधिक व्यापक आणि तीव्र स्वरूप घेईल.

सातबारा उताऱ्यावरून शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीचे स्वप्न साकार व्हावे यासाठी ही यात्रा काढण्यात आली होती. अकोला जिल्ह्यातील पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या पापळ गावातून ही यात्रा काढण्यात आली. १३८ किमी पायी मार्गक्रमण करत, देशातील पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झालेल्या महागाव तालुक्यातील गव्हाण या साहेबराव करपे या शेतकऱ्याच्या गावात या यात्रेचा समारोप करण्यात आला. या यात्रेदरम्यान बच्चु कडूंनी शेकडो शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्या, शासनाचे दुर्लक्ष समोर आणले आणि जनजागृती केली.

हा समारोप कार्यक्रम यवतमाळ जिल्ह्यात अंबोडा येथे पार पडला. यावेळी हजारो कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक उपस्थित होते. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, विजेची सवलत, आणि शेतमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी संघर्ष अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत या समारोपावेळी देण्यात आले.

या समारोप सोहळ्याच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले असून, या आंदोलनाच्या पुढील टप्प्याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या यात्रेच्या समारोपीय सभेत, आमदार रोहित आर पाटील, माजी आमदार राजेंद्र नगरधने, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्ष वर्षा निकम ,काँग्रेसच्या राजीव गांधी पंचायत राज सेलचे राज्य समन्वयक साहेबराव कांबळे आदिसह, सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## 'हत्या अन् हल्ल्यानं विचार मरत नाहीत'-प्रवीण गायकवाड हल्ला प्रकरणावर स्थगन प्रस्ताव दिला-विजय वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

रविवारी दुपारी अक्कलकोटमध्ये संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांच्यावर झाला. या हल्ल्यानं राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. मी एका पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी अक्कलकोट इथं गेलो होतो. गाडीतून उतरताच काही लोक धावत आले. त्यांनी शिवधर्म फाउंडेशनचे कार्यकर्ते असल्याचं सांगून शाई आणि ग्रीस फेकलं, अशी माहिती हल्ल्यानंतर प्रवीण गायकवाड यांनी दिली. याचे पडसाद आता विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उमटण्यास सुरुवात झाली. 'हत्या अन् हल्ल्यानं विचार मरत नाहीत' अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षाच्या आमदारांनी दिली आहे.

या हल्ल्याबाबत प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, या हल्ल्याचा आम्ही आधीच निषेध केला आहे. हा हल्ला पूर्वनियोजित होता. संभाजी ब्रिगेडमध्ये संभाजी हे नाव आल्यानं हा प्रकार घडला असल्याचं म्हटलं जाते आहे. पण, या पूर्वी सोलापूरकर आणि कोरटकर यांनी महाराजांचा अवमान केला, तेव्हा या हल्ला करणाऱ्यांनी निषेध का केला नाही? मनोहर भिडेचं नाव संभाजी ठेवलं आहे. मग त्यांना का गुरु मानता? प्रवीण गायकवाड यांच्यावर नाही तर, हा हल्ला पुरोगामी विचारावर असल्याचं आम्ही मानतो. काटेवर अनेक गंभीर गुन्हे आहेत. गाडीतून खाली ओढून मारण्यात आलं म्हणजे त्यांना खूनच करायचा होता. त्याला कोणी पाठीशी घालण्याची हिंमत करू नये. हा विषय आम्ही स्थगनसाठी दिला आहे. काही पिलावळी अशा जन्माला आल्या आहेत, जेव्हा महाराजांचा अपमान करतात, तेव्हा हे ब्र सुद्धा काढत नाहीत. या प्रकरणात भाजपाची दुटप्पी भूमिका आहे. खुनाचा प्रयत्न केला, असा गुन्हा दाखल झाला पाहिजे. यामागं बोलविता धनी वेगळा आहे, असे गुन्हेगार मोहरे पोसले जातात.



**ठार मारण्याचा कट होता का ?**

आमदार रोहित पवार म्हणाले की, प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. गौरी लंकेश, दाभोळकर, कुलबुर्गी यांचे विचार संपवण्याचा प्रयत्न केला. पण विचार संपणं शक्य नाही. भारतीय जनता पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र युवा संयोजक असं या दीपक काटे यांचं पद आहे. प्रवीण गायकवाड यांना गाडीतून बाहेर काढण्यात आलं. त्यांना मारण्याचा कट होता का? असा आमचा प्रश्न आहे. दीपक काटेवर कडक कारवाई करण्याची गरज आहे. दीपक काटे हा स्वतः भावाचा झाला नाही. त्याला संपवलं गेलं. त्याचे आई-वडील देखील त्याला स्वीकारत नाहीत. भाजपानं त्याला एक पद देऊन कसं स्वीकारलं? हा प्रश्न आहे.

**गायकवाड यांनी अनेकांना नोकऱ्या दिल्या**

पुढं बोलताना रोहित पवार म्हणाले की, आपण कडवट डाव्यांबद्दल चर्चा करतो. मग कडवट उजव्यांबाबत कधी चर्चा करणार? प्रवीण गायकवाड यांनी शिव शाहू आंबेडकर यांचा विचार जनतेपर्यंत, तरुण पिढीपर्यंत पोहोचवला. अनेकांना नोकऱ्या दिल्या. या प्रकरणात एसआयटी चौकशी करा किंवा हवी ती कारवाई करा. पण लक्षात ठेवा विचार कोणी मारु शकत नाही.

## राज्यसभेत बदलाची नांदी! ७३ खासदार निवृत्त, खर्गे यांच्यासह महाराष्ट्रातील ७ जणांचा समावेश

नवी दिल्ली । वृत्तसेवा

संसदेच्या वरिष्ठ सभागृहामध्ये म्हणजेच राज्यसभेसाठी राष्ट्रपतींनी ४ प्रतिष्ठित व्यक्तींची नावे नामनिर्देशित केली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ विधिज्ञ आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांचा समावेश आहे. त्यातच आता राज्यसभेच्या २४५ जागांपैकी ७३ जागांची निवडणूक पुढील वर्षी एप्रिल, जून आणि नोव्हेंबर या महिन्यांत होणार आहे. यात महाराष्ट्रातील ७ बड्या नेत्यांचा राज्यसभेचा कार्यकाळ संपत आहे.

निवृत्त होणा-या सदस्यांमध्ये केंद्रीय मंत्र्यांसह अनेक दिग्गज नेत्यांची नावे आहेत. त्यातील सर्वाधिक मोठे नाव म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे. त्यांचा कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी संपत आहे. त्याचप्रमाणे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हेही त्यांच्यासोबतच निवृत्त होणार आहेत.

मोदी सरकारमधील मंत्री हरदीप सिंह पुरी आणि बी. एल. वर्मा हे २५ नोव्हेंबरला निवृत्त होतील. यूपीतील आणखी आठ सदस्यांचा कार्यकाळही तेव्हाच संपणार आहे. तसेच केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू आणि जॉर्ज कुरियन यांचाही कार्यकाळ पुढील वर्षीच संपत आहे. काँग्रेसमधील आणखी एक मोठे नाव म्हणजे दिग्विजय सिंहही निवृत्त होणार आहेत.

झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, गुजरातमधील काँग्रेसचे मातब्बर नेते शक्तीसिंह गोहिल, तेलंगणातून काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, लोकसभेचे माजी उपसभापती थंबी दुराई, तिरुची शिवा आदी नेतेही निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहे. राष्ट्रपती नामनिर्देशित कोट्यातूनही एक महत्वाचे सदस्य निवृत्त होत आहेत. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळ मार्च महिन्यात संपत आहे.

**महाराष्ट्रातून कोण?**

महाराष्ट्रातील एकूण ७ सदस्यांचा २ एप्रिलला कार्यकाळ संपत आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार. त्यांच्यासोबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांचाही समावेश आहे. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील, भाजपचे खासदार धैर्यशील पाटील आणि शरद पवारांच्या पक्षाच्या खासदार फौजिया खान याही एकाच दिवशी निवृत्त होत आहेत.

# होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने आणलेले धान्य धारूरमध्ये पकडले

धारूर । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला गहू पोलिसांनी पाठलाग करून धारूर शहरातील एका दुकानासमोर पकडला. ही कारवाई पोलिसांनी सोमवारी (दि.१४) दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास केली. याचा पंचनामा सुरू असून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती धारुरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली आहे. दरम्यान, सदरील धान्य होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली वाहनचालकाने दिली आहे.



आडस येथील चौकात उभे असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आडसमधून धारूरच्या दिशेने जात असलेला छोटा टेम्पो (क्र.एम.एच. ४४ यू २२५७) दिसून आला. पोलिसांना संशयास्पद वाटल्याने त्याचा पाठलाग केला. तेव्हा धारूरमधील एका धान्याच्या दुकानासमोर टेम्पो उभा दिसून आला. यावेळी पोलिसांनी चौकशी केली असताना चालकाने त्याचे नाव इब्राहिम खाजा (रा.धारुर) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे केलेल्या चौकशीत धान्याच्या कसल्याही पावत्या आढळून आल्या नाहीत, तसेच सदरील धान्य राशनचे असल्याचा संशय आल्यावरून पंचनामा केला. यावेळी वाहन चालकाने होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून माल घेऊन धारूरच्या मोंढ्यात विक्रीसाठी देत असल्याची कबुली पंचनाम्यात दिली. पुरवठा विभागाकडे नोंदीनुसार, अशोक घुगे याचे राशन दुकान कोलंबस सहकारी संस्था अंतर्गत होळ येथे कार्यरत आहे. दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या उपस्थितीत केलेल्या पाहणीत अंदाजे ४० ते ५० गोण्या गहू आढळून आला असून सुमारे २५ क्विंटलहून अधिक धान्य असल्याची माहिती आहे. पुढील कार्यवाहीसाठी पुरवठा विभागाला अहवाल दिला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

राशन दुकानातून सर्रासपणे काळ्या बाजारात स्वस्त धान्याची विक्री करण्याचे गैरप्रकार वाढले आहेत. याकडे जिल्हा पुरवठा विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच, याप्रकरणात पोलिसांनी गतीने कारवाई केली असून आता पुरवठा विभागानेही कठोर कार्यवाही केल्याशिवाय राशनमाफियांना चाप बसणार नाही.

## गुन्हे वार्ता

### शेतजमिनीच्या वादातून मारहाण; सहा जणांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पोखरी रोडवर शेतजमिनीच्या वादातून सहा जणांनी एकाला मारहाण केल्याचा प्रकार नुकताच समोर आला आहे. यासंदर्भात राम गजाननराव लोमटे (रा. खडकपूरा, अंबाजोगाई) यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणी भावकीतील सहा जणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राम लोमटे हे आपल्या पत्नी स्वाती, आईवडील व मुलांसह राहून शेती करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे अंबाजोगाई येथील पोखरी रोडवरील सर्वे नं. ३२२, ३०७ ही जमीन वहीतीवर असून त्यावरून त्यांचा भावकीसोबत गेल्या काही काळापासून वाद सुरू आहे. फिर्यादीनुसार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ते व त्यांची पत्नी स्वाती शेतीतील कोळपणीसाठी गेले होते. यावेळी महेश बालासाहेब लोमटे, दिनेश बालासाहेब लोमटे, नागेश विजय लोमटे, दिपक दाजीसाहेब लोमटे व दिग्विजय दाजीसाहेब लोमटे हे तेथे आले. 'तु कशाला शेतात आलास? तु काय मालक आहेस का? सातबारा दाखव,' असे विचारून त्यांनी फिर्यादीस दमदाटी केली. फिर्यादीने आपण गेली सत्तर वर्षे वहीतीदार असल्याचे सांगितले असता वादग्रस्तांनी 'ही जमीन आमची आहे' असे म्हणत राम यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यावेळी राम यांच्या बचावण्यासाठी पत्नी पुढे आली असता तिलाही ढकलून देत शिवीगाळ करण्यात आली. 'शेतात परत आलास तर तुझे कुटुंब संपवून टाकीन, आमच्या विरोधात तक्रार केली तर खोटा अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू,' असा दम देखील आरोपींनी दिला. मारहाणीत जखमी झालेल्या राम यांना पत्नीने स्कुटीवरून उपचारासाठी रुग्णालयात नेले. सदर फिर्यादीवरून सर्व सहा आरोपींवर गुन्हा नोंदवण्यात आला.

### चापटा बुक्यांनी मारहाण करीत पत्नीच्या डोक्यात वीट मारली; पतीवर गुन्हा

केज । प्रतिनिधी

कागद वाचून सही करते, असे पत्नी म्हणाल्यावरून पतीने चापटा बुक्यांनी मारहाण करीत डोक्यात वीट मारून जखमी केल्याची घटना नांदूरघाट (ता. केज) येथे घडली. याप्रकरणी पतीविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

तेलगाव नाका, गांधीनगर (जि. बीड) येथील हिना अमीर अतार (वय ३०) या महिलेस एक मुलगा, एक मुलगी असून दोघा पती - पत्नीत सतत भांडण होत असल्याने मागील एक महिन्यापासून त्या माहेरी नांदूरघाट येथे आई वडिलांकडे राहत आहेत. १३ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्या एकट्याच असताना त्यांचा पती अमीर रशीद अतार याने येऊन सोबत आणलेल्या कागदावर सही मागितली. त्यावर त्या कागद वाचल्यावर सही करते, म्हणाल्या असता त्यांना शिवीगाळ व चापटाबुक्यांनी मारहाण करीत डोक्यात वीट मारून जखमी केले. चारित्र्यावर संशय घेत जीवे मारण्याची व स्वतःच्या जीवाचे बरेवाईट करून तुझ्या घरच्या लोकांची नावे घेतो, अशी धमकी दिली. अशी तक्रार हिना अतार यांनी दिल्यावरून अमीर अतार विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार उमेश आघाव करीत आहेत.

### परळीत भर रस्त्यावर अल्पवयीन मुलीची छेडछाड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

रस्त्यावरून जात असलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिची छेड काढल्या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहितीनुसार परळी शहरातील भीमनगर भागात राहणारी १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी रस्त्यावरून जात असताना त्याच ठिकाणी राहणार्या अविनाश साळवे नामक व्यक्तीने अल्पवयीन मुलीस रस्यामध्ये थांबवुन मला तुला काहीतरी बोलायचे आहे असे म्हणाला व थोडे समोर गेल्या नंतर तिच्या उजव्या हाताला पकडुन तीची छेड काढुन तिच्या मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले व शिवीगाळ केली.ही घटना शनिवार (दि.१२) रोजी सकाळी ११ च्या सुमारास घडली असून या प्रकरणी अल्पवयीन पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास पोउपनि शिंगणे हे करीत आहेत.

### बीड शहरात घरफोडी; पावणे चार लाखांचा ऐवज लंपास

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पिंगळेगल्ली येथील घराचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी बुधवार (दि.२) ते रविवार (दि.१३) च्या दरम्यान घरात प्रवेश करत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण ३,७१,५०५ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यात चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे.त्यातच शहरातील पिंगळेगल्ली येथील रहिवाशी असलेले धर्मराज श्यामलाल गुरखुदे (वय ५५) यांच्या घराचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी बुधवार (दि.२) ते रविवार (दि.१३) च्या दरम्यान घरात प्रवेश करत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण ३,७१,५०५ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.अज्ञात चोरट्यांविरुद्ध बीड शहर पोलीस (डीळाश)ठाण्यात रविवार (दि.१३) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## केजमधील तरुणाचा हाय-व्होल्टेज ड्रामा; ३ तासांच्या थरारानंतर पोलिसांनी सुखरूप खाली उतरवले

केज । प्रतिनिधी

दारूच्या नशेत एका तरुणाने थेट ११घीं च्या विद्युत खांबावर चढून जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याने केज तालुक्यातील सांगवी परिसरात शनिवारी (दि.१२) सायंकाळी मोठी खळबळ उडाली. तब्बल ३ तास चाललेल्या या थरार नाट्यानंतर, अखेर पोलीस आणि स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान दाखवत त्याला सुखरूप खाली उतरवले. वसंत केदार असे या तरुणाचे नाव आहे.

ही घटना शनिवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास केज-बीड रस्त्यावरील मस्साजोग जवळ घडली. वसंत केदार हा दारूच्या नशेत एका पवन ऊर्जा केंद्राजवळ असलेल्या ११ केव्ही क्षमतेच्या वीजवाहक खांबावर चढला. हा प्रकार परिसरातील नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलीस आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून महावितरणने तात्काळ त्या भागातील वीजपुरवठा खंडित केला, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला.

खांबावर चढलेला वसंत खाली उतरण्यास तयार नव्हता आणि तिथून उडी मारून आत्महत्या करण्याची धमकी देत होता. त्याला वाचवण्यासाठी दोन स्थानिक तरुणही खांबावर चढले, मात्र त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. घटनेची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार शहादेव मेहेत्रे आणि शिवाजी कागदे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गावकऱ्यांशी संवाद साधत परिस्थिती नियंत्रणात आणली. अखेर रात्री १० वाजण्याच्या सुमारास, काही धाडसी तरुणांच्या मदतीने पोलिसांनी वसंतच्या कमरेला दोर बांधून त्याला अत्यंत शिताफीने आणि सुखरूप खाली उतरवले.

स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, वसंत केदार हा दारूच्या आहारी गेला असून, अवास्तव मागण्यांसाठी अशा प्रकारचे कृत्य करण्याची ही त्याची पहिली वेळ नाही. यापूर्वीही त्याने असे प्रकार केले आहेत. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम आदमी पार्टी स्वबळावर लढणार–संग्राम घाडगे पाटील

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आम आदमी पार्टी स्वबळावर लढणार असल्याची माहिती आम आदमी पार्टीचे संघटन मंत्री संग्राम गाडगे पाटील यांनी दिली.

बीड येथे आम आदमी पार्टीच्या वतीने मराठवाड्यातील सर्व जिल्हा पदाधिकारी यांची मा. संग्राम गाडगे पाटील संघटन मंत्री महाराष्ट्र राज्य व मा. वैद्यनाथ राठोड सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या यांच्या नेतृत्वात व माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष यांच्या नियोजनाखाली मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांची विशेष बैठक पार पडली. यावेळी कार्यकत्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या बैठकीमध्ये महाराष्ट्राचे प्रभारी प्रकाश जारवाल आमदार दिल्ली व राष्ट्रीय प्रवक्त्या प्रीती शर्मा मेनन महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांची उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांकडून मराठवाड्याच्या निवडणुका लढल्या जाण्यासाठी आढावा व उमेदवाराची चाचपणी करण्याचे आदेश देण्यात आले. जिथे पदाधिकारी नसतील त्या ठिकाणी त्यांच्या नियुक्ती देणे निवडणुकांसाठी उमेदवार चाचणी करणे आम आदमी पार्टीचे दिल्ली व पंजाब मध्ये होत असलेले विकास कामे त्याच पद्धतीने महाराष्ट्रात देखील जिल्हा परिषदेच्या शाळा नगरपालिकेतील शाळा स्वास्थ केंद्र दवाखाने याविषयी घेऊन जनतेसमोर जाऊन आम आदमी पार्टीने केलेली कामे जनतेला सांगावी व येणाऱ्या काळामध्ये आम आदमी पार्टी जास्तीत जास्त उमेदवार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उभा करून आपले प्रदर्शन जास्तीत जास्त कसे चांगले करता येईल याविषयी मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी महाराष्ट्राचे सचिव वैद्यनाथ राठोड, बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष चव्हाण, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष राहुल माकोडे, लातूरचे जिल्हाध्यक्षअश्विन नलबले, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष बालाजी देशमुख पाटील, जालन्याचे जिल्हाध्यक्ष अंकुश कांबळे, जालना महानगरचे अध्यक्ष संजय हिवाळे, इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वंचित बहुजन आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजप वगळता इतर पक्षांसोबत युती करून लढणार

**बीड । प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने भाजप सोडता इतर कोणत्याही पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी तयारीचा शुभारंभ बीड येथून करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या बीड जिल्ह्यातील निरीक्षक पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक बीड येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली.

या बैठकीस निरीक्षक अंकुश जाधव, भारत तांगडे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड आणि तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.



बैठकीत महासचिव खंडू नाना जाधव, अंकुश जाधव व भारत तांगडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी भाजप वगळता इतर पक्षांशी स्थानिक स्तरावर युती करण्याचे निर्देश दिले असून, त्यानुसार बीड जिल्ह्यातील रणनीती आखण्यासाठी ही बैठक घेण्यात आली.

बैठकीत जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच विविध गण व गटांचा आढावा घेण्यात आला. गावनिहाय आणि वार्डनिहाय ठिकाणी पदाधिकारी नियुक्त नसलेल्या ठिकाणी लवकरच नेमणुका करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. इच्छुक उमेदवारांची चाचपणी लवकरच सुरू करण्यात येईल, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

या वेळी निरीक्षक भारत तांगडे यांनी जिल्ह्यातील निवडणूक तयारी व उपाययोजना यावर सविस्तर माहिती दिली. बैठकीस खंडू नाना जाधव, सुरेश पोतदार, ज्ञानेश्वर कवठेकर, मिलिंद सरपते, पुरुषोत्तम वीर, रोहन मगर, जंजाळ सर, अनिताताई चक्रे, तुरुकुमारे मॅडम, उमेश तळवे, संदीप जाधव, विनोद भाई, पाशा भाई, श्रीकांत वाघमारे, राजेश कुमार जोगदंड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीमुळे बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीची रणनिती अधिक स्पष्ट झाली असून, युतीचा अजेंडा पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## शिवसेनेची आज बीडमध्ये महत्वपूर्ण आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना मराठवाडा संपर्क नेते आमदार सुनील प्रभू, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, शिवसेना उपनेते मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनानुसार संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा शिवसेनेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आज मंगळवार दि १५ रोजी रोजी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका, युती -आघाडी- सावतंत्र संदर्भात चर्चा, पक्ष संघटन, पक्ष विचार, पक्ष बांधनी, पक्षातील इतर पदाधिकारी यांच्या रिक्त जागी नव्या नियुक्त्या याविषयी चर्चा करण्यासाठी आयोजित केली आहे . तरी सर्व उपजिल्हाप्रमुख ,जिल्हा संघटक, तालुकाप्रमुख, विभागप्रमुख, शहर प्रमुख, शाखाप्रमुख , युवासेना, महिला आघाडी, कामगार सेना, शिव सहकार सेना, वाहतूक सेना, शिक्षक सेना, व शिवसेनेच्या अंगीकृत सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आव्हान जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे. सदरील बैठक दि १५ मंगळवार रोजी दुपारी १:०० वाजता बसस्थानका मागे असणाऱ्या जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपन्न होणार आहे.

## लिंबागणेश येथे उभारला जाणार १०१ फूट उंच भगवा ध्वज; हिंदू संस्कृतीचे भव्य प्रतीक

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान परिसरात १०१ फूट उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. हिंदू संस्कृती, परंपरा व त्यागाचे प्रतीक असलेल्या या भगव्या ध्वजाच्या स्थापनेसाठी १४ जुलै रोजी सोमवारी सकाळी भूमिपूजनाने शुभारंभ करण्यात आला. या ऐतिहासिक क्षणी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भक्तगण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ध्वज स्थापनेमागील उद्देश आणि प्रेरणा**



भगवा ध्वज म्हणजे केवळ कापड नव्हे, तर हिंदू धर्माची शौर्यपर परंपरा, एकता, त्याग आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक मानला जातो. या ध्वजामुळे लिंबागणेशची धार्मिक ओळख अधिक दृढ होणार असून, भालचंद्र गणपती मंदिराला नव्या आध्यात्मिक उंचीवर नेण्याचा ग्रामस्थांचा संकल्प आहे.

**गावकऱ्यांच्या एकतेचा आदर्श उपक्रम**

विशेष म्हणजे या उपक्रमासाठी कोणतीही संस्था वा मंडळ पुढे न येता, संपूर्ण ग्रामस्थांनी एकत्र येऊन हे कार्य हाती घेतले आहे. तरुण वर्ग, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक व सर्व भक्तगणांनी श्रमदान, आर्थिक साहाय्य व सक्रिय सहभाग दिला आहे. सामूहिक प्रयत्नातून हा उपक्रम साकारला जात असल्याने सामाजिक ऐक्याचे मूर्त उदाहरण सादर होत आहे.

**नियोजनबद्ध कार्यक्रम व धार्मिक वातावरण**

ध्वज उभारणीपूर्वी स्तंभबांधकाम, संरचना व परिसर सुशोभीकरणाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. येत्या संकष्टी चतुर्थीपूर्वी भगवा ध्वज उभारण्याचे लक्ष्य असून, त्या पार्श्वभूमीवर हभप कीर्तन, हरिपाठ, गजर, आरती अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. संपूर्ण गावात या उपक्रमामुळे भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण आहे.

**ध्वजाच्या स्थापनेने गावाला मिळणार नवी ओळख**

हा भगवा ध्वज केवळ उंचीने नव्हे, तर भाविकांच्या मनात श्रद्धा, गौरव आणि हिंदुत्वाची जाणीव जागृत करणारा ठरणार आहे. लिंबागणेश गावाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे प्रतीक म्हणून हा ऐतिहासिक उपक्रम कायम लक्षात राहील, यात शंका नाही.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)
"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस,
जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर,
नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात
तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी
संपर्क करा

९४२३४७१८३३
७०२०६४२६९३




दै. संचार च्या अंकाची
पीडीएफ आपल्या
मोबाईलवर मिळविण्यासाठी
९४२३४७१८३३ या
मोबाईल नंबरवर मेसेज
करा किंवा क्यूआर कोड
स्कॅन करा